# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र- रानिआ/आस्था-२०२४/प्र.क्र. ५१/का२
नवीन प्रशासन भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२
ई-मेल - sec.mh@gov.in
दूरध्वनी क्र. ०२२ २२०४५५८९
दिनांक :- १ ऑक्टोबर, २०२४

## परिपत्रक

राज्य निवडणूक आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, आयोगाच्या कार्यालयात जिल्हा स्तरावरुन निवडणूकसंबंधी टपाल/निवेदने/तक्रारी प्राप्त होत असतात. यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसह भारत निवडणूक आयोगाच्या अखत्यारीतील लोकसभा, राज्यसभा, विधानपरिषद, विधानसभा इत्यादी निवडणुकांशी संबंधित टपालांचा समावेश असतो. राज्य निवडणूक आयोगाशी संबंधित नसलेल्या टपालावर संस्करण करणे, त्यावर क्षेत्रीय कार्यालयास अपेक्षित असलेली कार्यवाही करणे शक्य होत नाही. असे टपाल/निवेदने संबंधित कार्यालयाकडे वर्ग करणेसाठी मनुष्यबळ व वेळ अनावश्यकरित्या खर्च पडतो. त्यामुळे निवडणूकांशी संबंधित पत्रव्यवहार हा पत्रातील विषयाच्या अनुषंगाने कसा आणि कोणत्या कार्यालयाशी करण्यात यावा, यासंदर्भातील सूचना थोडक्यात खालीलप्रमाणे देण्यात येत आहेत :-

१. <u>राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र</u> - राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र ही सांविधानिक, स्वायत्त संस्था आहे. भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३के व अनुच्छेद २४३झेडए नुसार मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्यावर केवळ स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका घेण्याची सांविधानिक जबाबदारी आहे. म्हणजेच <u>आयोगाकडून केवळ महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायती यांच्याच निवडणुका घेण्यात येतात</u>. त्यामुळे केवळ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसंबंधीचा पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करण्यात यावा:-

<u>राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र</u>
पहिला मजला, नवीन प्रशासन भवन,
मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड,
मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र. ०२२-२२०४५०७५/०२२-२२८४६७२०
ई-मेल - sec.mh@gov.in
संकेतस्थळ - mahasec.maharashtra.gov.in

२. <u>भारत निवडणूक आयोग</u> - महाराष्ट्र राज्यातील लोकसभा, राज्यसभा, विधानसभा, विधानपरिषद, पदवीधर मतदार संघ, शिक्षक मतदार संघ यांच्या निवडणूका मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्या अखत्यारीत येतात. सबब, या निवडणुकांसंबंधीचा पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करण्यात यावा:-

मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य,
६ वा मजला, विस्तार इमारत,
सामान्य प्रशासन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०००३२
दूरध्वनी क्र. ०२२- २२०२९९६५
ई-मेल - ceo_maharashtra@eci.gov.in
संकेतस्थळ - ceoelection.maharashtra.gov.in

३. राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य - सहकार विभागाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० खाली येणाऱ्या सहकारी संस्थांच्या निवडणूका आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेमार्फत घेण्यात येतात. यासंबंधीचा पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करण्यात यावा :-

आयुक्त,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य
जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५, बी. जे. रोड,
पुणे - ४११ ००१
दूरध्वनी क्र. ०२०-२६०५०६४१
ई-मेल - sceapune@gmail.com
संकेतस्थळ - scea.maharashtra.gov.in

४. उपरोक्त संस्था/कार्यालयांचे पत्ते, दूरध्वनी क्रमांक व ई-मेल वर नमूद आहेत. तथापि, त्याबाबतची खातरजमा संबंधित संकेतस्थळावरुन करुन घेण्यात यावी, ही विनंती.

५. सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, महानगरपालिका आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी, पोलीस आयुक्त/पोलीस अधिक्षक यांनी त्यांच्या अधिनस्त असलेल्या विभागीय/जिल्हा/क्षेत्रीय शासकीय कार्यालयांना व अधिकारी व कर्मचारी यांना याबाबतची माहिती द्यावी. जेणेकरुन संबंधित निवेदने/तक्रार/अर्ज योग्य कार्यालयाकडे सादर केल्या जातील व त्यावर पुढील योग्य ती कार्यवाही विनाविलंब करता येईल.

आदेशानुसार,

(राजेंद्र पाटील)
उपायुक्त,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रत-१. सर्व विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी/महानगरपालिका आयुक्त/मुख्य कार्यकारी अधिकारी/

C:\Users\pradip.parab\Desktop\CLASSIFICATION FILE\दस्तऐवज अद्ययावतीकरण परिपत्रक.docx

पोलीस आयुक्त/ पोलीस अधिक्षक - **कार्यवाहीसाठी**

२. आयुक्त, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, जुनी मध्यवर्ती जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५, बी. जे. रोड,पुणे - ४११ ००१ - कार्यवाहीसाठी

३. उप सचिव, मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कार्यालय, सामान्य प्रशासन विभाग, मुंबई -**माहितीसाठी**

४. उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग(आस्थापना/का-३७), हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई

५. मा.आयुक्त व सचिव यांचे स्वीय सहायक, राज्य निवडणूक आयोग, मुंबई -माहितीसाठी

६. राज्य निवडणूक आयोगातील सर्व कार्यासने

७. सूचनाफलक, राज्य निवडणूक आयोग

८. निवड नस्ती - आस्थापना

## टपाल/अभ्यागतांकरीता सूचना

| राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र | मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य |
|---|---|
| नवीन प्रशासन भवन, पहिला मजला, मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२. | ६ वा मजला, विस्तार इमारत, सामान्य प्रशासन विभाग, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. |
| भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३के व अनुच्छेद २४३झेडए नुसार मा.राज्य निवडणूक आयुक्त यांच्यावर स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुका म्हणजेच केवळ महानगरपालिका, नगरपरिषद/ नगरपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायती निवडणुका घेण्याची सांविधानिक जबाबदारी आहे. | मुख्य निवडणूक अधिकारी यांचे कार्यालयामार्फत राज्यातील राज्यसभा, लोकसभा, विधानपरिषद व विधानसभा यांच्या सार्वत्रिक व पोट निवडणुका घेण्यात येतात. |
| स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे महानगरपालिका, नगरपरिषद/नगरपंचायती, जिल्हा परिषद व पंचायत समिती तसेच ग्रामपंचायती यांच्या निवडणूक काळात निवडणूकविषयक सर्व पत्रव्यवहार तसेच आचारसंहितेच्या अंमलबजावणीशी संबंधित असलेले अर्ज, तक्रारी, निवेदने राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करावीत. | राज्य सभा/ लोकसभा/ विधान परिषद/विधानसभा/ पदवीधर मतदारसंघ/शिक्षक मतदार संघ यांच्या निवडणूक काळात निवडणूकविषयक सर्व पत्रव्यवहार तसेच आचारसंहितेच्या अंमलबजावणीशी संबंधित असलेले सर्व अर्ज, तक्रारी, निवेदने इ. मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय यांचेकडे सादर करावीत.<br><br>मतदार यादीमध्ये नाव नोंदणी/नाव कमी करणे/मतदार ओळखपत्र इ. संबंधितांच्या तक्रारी संबंधित जिल्हाधिकारी कार्यालय/ तहसिल कार्यालय यांच्याकडे सादर कराव्यात. |